**शेतक-यांनी फवारणी करताना योग्य ती काळजी घ्यावी**
**जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचे आवाहन**



दि. २९: शेतकरी आपल्या शेतातील सोयाबीन, कापूस या पिकांवरील रोग व किडींचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता विविध प्रकारच्या किटकनाशकाची फवारणी करीत आहे. फवारणीचे वेळी आवश्यक ती दक्षता न घेतल्यामुळे अपघाताला समोरे जावे लागत आहे. त्यामुळे जिल्हयातील शेतक-यांनी फवारणी करताना योग्य ती काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.

किटकनाशकांच्या फवारणीमुळे शेतमजूरांच्या आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. जिल्हयातील शेतकरी व शेतमजुर बांधवांनी शेतातील पिकांवर फवारणी करतांना किटकनाशकावरील लेबल व माहितीपत्रकांच्या वाचन करून खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे. फवारणी करतांना संरक्षक कपडे, बुट हातमोजे व नाकावरील मास्क इत्यादींचा वापर करावा. तसेच आपल्याजवळील रूमाल वा शेला तोंडावर बांधून फवारणी करावी. डोळयात किटकनाशक जाणार नाही याची काळजी शेतक-यांनी घ्यावी. किटकनाशकाच्या डब्यावरील लाल रंगाच्या पतंगीच्या आकाराचे चिन्ह असलेले किटकनाशक सर्वात जास्त विषारी असून पिवळा, निळा व हिरवा असा क्रम लागतो. त्यामुळे रंगावरूनही शेतक-यांना किटकनाशकांची तीव्रता कळू शकत असल्याने आवश्यक काळजी शेक-यांनी घ्यावी. तसेच शेतक-यांनी तणनाशके फवारणीचा पंप किटकनाशके फवारणीकरीता वापरु नये, किटकनाशक वापरण्यापूर्वी लेबल व माहितीपत्रक वाचून खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे, हवेच्या विरूध्द दिशेने फवारणी करू नये, फवारणीचे वेळी फवारणी करणा-याने मध्यांतरामध्ये जेवण, न्याहारी करण्यापूर्वी आपले हात,चेहरा स्वच्छ धुवावा, तसेच घरी आल्यानंतर आंघोळ करावी. असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.

अपघाताने किटकनाशक पोटात गेल्यास किंवा त्वचा, डोळे, श्वसनेंद्रियाव्दारे विषबाधा होऊ शकत असल्याने व्यक्तीस विषबाधा झाल्यास अपघात स्थळापासुन दूर न्यावे. त्याच्या अंगावरील कपडे बदलावे. रोग्याचे अंग बाधीत अवयव ताबडतोब साबन लावून स्वच्छ पाण्याने धुवावे व कोरडया टॉवेलने पुसावे. किटकनाशक पोटात गेले असल्यास रोग्याला ताबडतोब ओकारी येण्याची उपाययोजना करावी. रोग्यास त्वरीत किटकनाशकाच्या माहितीपत्रकासह उपचाराकरिता जवळच्या दवाखान्यात घेऊन जावे. तसेच डॉक्टरांच्या निगराणीत उपचार करावेत. असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.

………………………………………………………………